आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३ जून २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय; पदनिर्मिती, जागा आणि अनुषंगिक खर्चासाठी चार कोटी रुपयांच्या तरतुदीला मान्यता

- अवकाळी पावसामुळे कापणी केलेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत सरकार विचार करेल, असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत पुण्यात आयोजित कृषी हॅकेथॉनचा केंद्रीय कृषीमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत समारोप

- राज्य परिवहन महामंडळातल्या कर्मचाऱ्यांना एक कोटी रुपयांचं अपघाती विमा कवच लागू करण्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अंतिम सामना रंगणार

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यतेखालील राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला. आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषांगिक खर्चालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. केंद्रीय स्तरावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगेवगळे असल्यामुळे दोन स्वतंत्र आयोग असणं आवश्यक आहे. त्यामुळे ५१ व्या

जनजाती सल्लागार परिषदेत राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगात एक अध्यक्ष आणि चार अशासकीय सदस्य असतील. आयोगाकरिता नव्याने २६ पदं निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठी तसंच अनुषंगिक खर्चासाठी ४ कोटी २० लाख रुपयांच्या तरतूदीला बैठकीत मान्यता देण्यात आली.

या आयोगाची स्थापना केली असली तरी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचा आदिवासी विकास विभाग सुद्धा कार्यरत राहणार आहे.

याशिवाय धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला इथली साडे आठ एकर जमीन हस्तांतरित करण्यासाठीच्या अटी, शर्तींमधल्या सुधारणांना मान्यता देण्यात आली आहे. यासह राज्य कामगार विमा महामंडळाचं दोनशे खाटांचं विमा कामगार रुग्णालय उभारण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करोडी इथली सहा हेक्टर गायरान जमीन, तसंच पुण्यातील बिबवेवाडी, अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर, सिन्नर, बारामती, सातारा आणि पनवेल इथल्या रुग्णालयांना जमीन द्यायला तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पथकराच्या सवलतीसाठी भरपाई देण्याचा आणि मुंबईच्या प्रवेशद्वाराच्या पाच पथकर स्थानकावर सवलत दिल्यामुळे महामंडळाला भरपाई देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यात अवकाळी पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत सरकार विचार करेल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्याबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी हे

आश्वासन दिलं. पावसामुळे सुक्या मासळीचं नुकसान झालेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी दिली.

घराची दुरुस्ती आणि पुनर्बांधणीसाठी मदतीकरीता तात्काळ निधी देण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार सुमारे ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी या बैठकीत  दिली.

**<><><><><>**

पिकं आणि कीडरोग मुक्त रोपं निर्मितीसाठीच्या ‘क्लिन प्लांट’ कार्यक्रमांतर्गत देशातील ९ पैकी ३ केंद्र महाराष्ट्रात उभारणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केली. विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत पुण्यात आयोजित कृषी हॅकेथॉनच्या समारोप समारंभात ते आज बोलत होते. द्राक्षाचं केंद्र पुणे इथं, संत्र्यासाठी नागपूर आणि डाळींबासाठी सोलापूर इथं केंद्र सुरू करण्यात येणार असून या केंद्रांच्या आधारे राज्याचं फलोत्पादन क्षेत्र जगात आघाडी घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेती क्षेत्रासमोर अनेक समस्या असताना शेतकऱ्याला साहाय्य करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा एकमात्र उपाय आहे. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणं गरजेचं असून त्यासाठी कृषी विभागानं पुढाकार घेऊन कृषी महाविद्यालयांमध्ये इन्क्युबेशन केंद्रं तयार करावीत, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**---बाईट---मुख्यमंत्री.**

शेतकऱ्यांच्या फायदेशीर शेतीला दिशा देण्याचं कार्य कृषी हॅकॅथॉननं केलं आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले.  यापुढील काळात विविध ठिकाणी असे उपक्रम राबवण्यात येतील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या ३० लाख बेघर जनतेला प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरे मिळवून देणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामीण लाभार्थी मेळावा आज पुण्यामध्ये झाला त्यावेळी ते बोलत होते. या घरांसाठी ८० हजार कोटी रुपये खर्चाची तरतूद केंद्र सरकारने केली असून राज्य सरकारतर्फे प्रत्येक लाभार्थ्याला ५० हजार रुपयांचं अनुदान देणार असल्याचं ते पुढे म्हणाले.

यावेळी केंद्रीय ग्रामविकास आणि कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या समारंभात महाआवास राज्यस्तरीय पुरस्कारांचं वितरण झालं तसंच काही लाभार्थ्यांना त्यांच्या घरांच्या प्रतीकात्मक चाव्या प्रदान करण्यात आल्या.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळातल्या कर्मचाऱ्यांना एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केली. सह्याद्री अतिथीगृहात एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. महामंडळातल्या कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर या महिन्यापासून ४६ टक्क्यांऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता देण्याचा निर्णय या बैठकीत झाला. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास नऊ ऐवजी १२ महिन्यांसाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. स्वच्छतागृह, विश्राम कक्ष यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्य देणं तसंच, एसटीच्या माध्यमातून कार्गो सेवा सुरू करण्यावर भर देण्याचं आवाहनही शिंदे यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

राज्य सरकारनं कोविड- १९ च्या व्यवस्थापनासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सर्व आरोग्य सुविधांनी इन्फ्लूएंझा-सदृश आजार आणि श्वसनाची गंभीर समस्या असलेल्या ५ टक्के रुग्णांची तपासणी करावी, असे निर्देश दिले आहेत. आरोग्य विभागानं सर्व महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि जिल्हा प्रशासनांना हे निर्देश दिले आहेत. हातांची स्वच्छता, श्वसन संस्थेचं आरोग्य, खोकताना आणि शिंकताना तोंड आणि नाक झाकणं तसंच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचं वर्तन याबाबत जनजागृती करणारे उपक्रम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात सध्या कोविडचे ५०६ रुग्ण उपचार घेत आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर अंतिम सामना होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

२००८ पासून सुरू झालेल्या आयपीएल स्पर्धेत आजतागायत या दोन्ही संघांकडे विजेतेपद आलेलं नाही. त्यामुळे दोन्ही संघांसाठी आजचा सामना महत्त्वाचा आहे.

**<><><><><>**

जय श्रीराम म्हणणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी प्रभू श्रीरामाच्या आदर्शांचं पालन करत नाहीत, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. ते आज यवतमाळ जिल्ह्यात आयोजित दाभाडी ते आर्णी पदयात्रेच्या समारोपप्रसंगी बोलत होते. प्रधानमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचं पालन केलं नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ६३६ अंकाची घसरण झाली आणि तो ८० हजार ७३७ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ७४ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ५४२ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यात कातवणेश्वर इथं कृषी विभाग आणि स्थानिक पोलिसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत ३ लाख ३१ हजार रुपये किमतीचा अनधिकृत खत साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कृषी सेवा केंद्राच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला  आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून, विदर्भात  तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहील असा  हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//